राष्ट्रीय कर्करोग,मधुमेह, हृदयरोग व पक्षाघात प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना योजनेअंतर्गत विवेकानंद मेडीकल फाऊंडेशन अँन्ड रिसर्च सेंटर, लातुर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रिजनल कँन्सर केअर सेंटर, नागपूर येथे टर्शरी केअर कॅन्सर सेंटर उभारण्यासाठी राज्य हिश्श्याचा निधी (सर्वसाधारण योजना) वितरणास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः टिसीसी २०१८/ प्रक्र-२२/आरोग्य ३(अ)
गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, १० वा मजला, ए विंग
एल.टी.मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१
दिनांक: २९ मार्च,२०१८.

वाचा :-

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, **शासन निर्णय क्रमांकः टिसीसी-२०१७/प्र.क्र.१६२/आ-३अ, दि.२७/०७/२०१७.**
२) समक्रमांकाचा शासन निर्णय: दि.०१/०२/२०१८
३) **आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे क्रमांक-T-२००१५/२/२०१४- CR(NCD-II SECTION/General) दि. १३ जानेवारी, २०१७**
४) **आरोग्य व कुटुंब कल्याण ,मंत्रालय, भारत सरकार यांचे क्रमांक-T-२००१५/०९२०१६/CR(NCD-II SECTION/General) दि. १६ जून, २०१७**

प्रस्तावना -

राष्ट्रीय कर्करोग, मधुमेह, हृदयरोग व पक्षाघात व नियंत्रण कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (राज्य हिस्सा) या योजनेंतर्गत विवेकानंद मेडीकल फाऊंडेशन अँड रिसर्च सेंटर, लातुर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रिजनल कँन्सर केअर सेंटर, नागपूर येथे Tertiary Cancer Care Center स्थापन करण्याकरीता सर्वधारण (General) या घटकासाठी केंद्र शासनाने सन २०१६-१७ मध्ये व सन २०१७-१८ मध्ये या दोन्ही संस्थांना वितरीत केलेल्या निधीच्या समरुप राज्य हिस्सा ४० टक्के प्रमाणे निधी सदरहू संस्थेस उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे

शासन निर्णय-

सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरीता राष्ट्रीय कर्करोग,मधुमेह,हृदयरोग व पक्षाघात प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना या योजनेंतर्गत विवेकानंद मेडीकल फाऊंडेशन अँड रिसर्च सेंटर, लातुर येथे टर्शरी कँसर केअर सेंटर (TCCC) सर्वसाधारण योजनेंतर्गत केंद्र शासनाने मंजूर केलेल्या निधीच्या समरुप ४०

टक्के रक्कम रुपये ८२०.४६ लक्ष (अक्षरी रुपये आठ कोटी वीस लक्ष सेहचाळीस हजार) तसेच राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कॅन्सर रिसर्च सेंटर, नागपूर या संस्थेस रुपये.७२१.०० लक्ष (अक्षरी रुपये सात कोटी एकवीस लक्ष) इतके अनुदान सर्वसाधारण योजना अंतर्गत वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

सदर प्रस्तावरील खर्च मागणी क्र.आर-१२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय मधुमेह कर्करोग व ह्रदयरोग व पक्षाघात प्रतिबंध नियंत्रण कार्यक्रम, सर्वसाधरण योजना (General) (२२१० एफ ३९१) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मजूर करण्यात आलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

सदर निधी विवेकानंद मेडीकल फाऊंडेशन अँड रिसर्च सेंटर, लातुर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रिजनल कॅन्सर रिसर्च सेंटर, नागपूर यांना अदा करण्यासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून सह संचालक, आरोग्य सेवा (अर्थसंकल्प व प्रशासन), मुंबई यांच्याकडे वितरीत करण्यात येईल.

सदर अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर रकमेचे देयक त्यांनी कोषागारात सादर करुन विहित केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम संबंधित कार्यक्रम अधिकाऱ्यांकडे सुपुर्द करावी.

शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७ मधील परिशिष्टातील अ.क्र. ८ मध्ये तपासणी सूचीतील अ.क्र. १ ते १० ची खालीलप्रमाणे पुर्तता होत असल्याबाबत प्रमाणित करण्यात येत आहे.

अ.क्र.	तपासणी सूचीनुसार बाब	शेरा
१	योजनेस प्रशासकीय मान्यता	शासननिर्णय साआविक्र.३००११/ प्र.क्र.५५२/ २०१५ /आ-७,दि.२७डिसेंबर,२०१६ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
२	निधी वितरण शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पूर्तता झाल्यानंतरच होणार आहे	प्रमाणित करण्यात येते की, शासन निर्णयातील अटी व शर्तींची पूर्तता झाल्यानंतरच निधी वितरीत केला जाईल.
३	यापूर्वी वितरीत केलेल्या ७५ % निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र.	या योजनेअंतर्गत सदर संस्थेस प्रथमत: निधी वितरीत करण्यात येत आहे. सबब हा मुद्दा लागू होत नाही.
४	यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरिक्षक महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत	प्रमाणित करण्यात येते की, निधीच्या अनुषंगाने लेखापरिक्षक/महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत.
५	निधी लाभार्थ्यांच्या थेट खात्यात जमा होणार आहे.	प्रमाणित करण्यात येते की, निधी लाभार्थ्यांच्या खात्यात थेट जमा होणार आहे.
६	वस्तु खरेदी करण्यापूर्वी खरेदी केलेल्या अशा वस्तुची नोंद (Dead Stock) रजिस्टर मध्ये	प्रमाणित करण्यात येते की, वस्तु खरेदी करण्यापूर्वी वस्तुंची नोंद Dead Stock मध्ये घेण्याबाबत संबंधित संस्थेस कळविण्यात येईल.

	घेण्यात आली असून त्या पडून नाहीत,असे प्रमाणपत्र.	
७	यामधून खरेदी होणार असल्यास प्रत्यक्ष वस्तु प्राप्त झाल्यानंतर संबंधितांना देयक अदा केले जाणार आहे.	प्रमाणित करण्यात येते की, प्रत्यक्ष वस्तु प्राप्त झाल्यानंतर संबंधितांना देयक अदा करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात येतील
८	आवश्यक त्या ठिकाणी आदिवासी/सामाजिक न्याय विभाग यांची निधी वितरणास सहमती आहे.	प्रमाणित करण्यात येते की, आदिवासी/सामाजिक न्याय विभागाची आवश्यक तेथे सहमती घेण्यात आली आहे.
९	प्रस्तुत योजनेत कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही	प्रमाणित करण्यात येते की, संक्षिप्त देयक प्रलंबित नाही
१०	निधी स्वीय प्रपंची लेखा अथवा बँक खात्यात जमा न करता खर्च केला जाणार आहे.	प्रमाणित करण्यात येते की, निधी स्वीय प्रपंची लेखा अथवा बँक खात्यात जमा न करता खर्च केला जाणार आहे.

वित्त विभागाच्या क्र. अर्थसं-२०१६/प्रक्र-८९/अर्थ-३ दिनांक १८ एप्रिल, २०१७ च्या परिच्छेद ७ ते १८ व सोबतच्या परिशिष्टामधील अनुक्रमां ८ मध्ये नमुद केलेल्या प्रत्येक अटी व शर्तीची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. या पूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटीच्या लेखापरिक्षणामध्ये कोणतेही गंभीर आक्षेप घेतलेले नाहीत. सदर प्रस्तावावरील वितरीत करण्यात येणारा निधी पूरवठा दाराच्या खात्यात थेट जमा होणार आहे. सदर प्रस्तावात वस्तु खरेदी प्रस्ताव तसेच भांडवली वस्तु खरेदीचा समावेश नाही. सदर कार्यक्रमाच्या संबंधित लेखाशीर्षा खाली एक वर्ष जुने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही. शासनाच्या धोरणानुसार सदर प्रस्तावावरील निधी राज्य आरोग्य सोसायटीच्या स्वतंत्र बँक खात्यात जमा करुन खर्च करण्यात येणार आहे. असे प्रमाणित करण्यात येत आहे.

सदर देयक सशर्त असून वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.२०१३/प्र.क्र-८५/२०१३/अर्थसंकल्प-३, दिनांक २५ एप्रिल,२०१३ नुसार उपरोक्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर केल्यानंतरच पुढील अनुदान वितरीत करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणी केंद्र शासन / राज्य शासन व विवेकानंद मेडीकल फाऊंडेशन अँड रिसर्च सेंटर, लातुर आणि केंद्र शासन / राज्य शासन व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रिजनल कॅन्सर रिसर्च सेंटर, नागपूर यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारातील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

सदर शासन निर्णय शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७ मधील विभागास प्रदान केलेलया अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८२१०००४०७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: CN = Rajendra Shamraoji Kaurte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.03.29 16:55:22 +05'30'

(रा.शा.कौरते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.मंत्री (सा.आ. व कु.क) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा.राज्य मंत्री (सा.आ. व कु.क) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. विरोधी पक्षनेता/विधानसभा/विधान परिषद, विधानभवन, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा परीक्षा) / (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
६. महालेखापाल (लेखा परीक्षा) / (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
७. अधिदान व लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
९. आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
१०. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
११. सह संचालक, (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
१२. उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ, लातुर मंडळ, लातुर/ नागपूर मंडळ,नागपूर
१३. वित्त विभाग (व्यय-१३/अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.
१४. नियोजन विभाग (का-१४७२) मंत्रालय, मुंबई
१५. सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प/लेखा/आरोग्य-७), मंत्रालय, मुंबई.
१६. जिल्हा कोषागार अधिकारी, लातुर/ नागपूर
१७. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रिजनल कॅन्सर रिसर्च सेंटर, नागपूर
१८. विवेकानंद मेडीकल फाऊंडेशन अँड रिसर्च सेंटर, लातुर
१९. अवर सचिव(अर्थसंकल्प), सा.आ.वि,मंत्रालय, मुंबई.
२०. निवडनस्ती (कार्यासन आरोग्य-३अ)